मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १६१ ■ शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### भाजपातर्फे मराठी दांडीयाचे आयोजने

मुंबई : हॅलो प्रभात

भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे सलग चौथ्या वर्षी भव्य मराठी दांडीयाचे आयोजन छत्रपती संभाजी महाराज मैदान, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) येथे करण्यात आले आहे.

२७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर असे पाच दिवस दररोज सायंकाळी ७ वाजता हा 'मराठी दांडिया' होणार असून यावेळच्या दांडियाची थीम 'ऑपरेशन सिंदूर' आहे, अशी माहिती मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमीत साटम, मराठी दांडियाचे आयोजक व भाजपा प्रदेश कोषाध्यक्ष आ. मिहीर कोटेचा यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

### अंबाबाईचरणी दीड कोटींचे दान

कोल्हापूर : हॅलो प्रभात

करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या चरणी जुलै व ऑगस्ट महिन्यात भाविकांकडून १ कोटी ५६ लाख ८४ हजार ५३३ रुपयांचे दान अर्पण करण्यात आले.

यामध्ये रोख रक्कम, नाणी, परकीय चलन, मणी मंगळसूत्रे, जोडवी, पैंजण यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अखत्यारीतील १० दानपेट्यांमधील देणगी मूल्यांची मोजदाद पूर्ण झाली.

### नेपाळमध्ये अडकलेले पर्यटक सुखरूप परतणार

कोल्हापूर : हॅलो प्रभात

नेपाळमध्ये जेन झी आंदोलनाच्या नावाखाली सुरू झालेल्या अराजक परिस्थितीमुळे काठमांडूत अडकलेल्या भारतीय पर्यटकांचा परतीचा मार्ग सुकर झाला आहे.

मानस सरोवर यात्रेसाठी गेलेले कोल्हापूरचे डॉ. अजित पाटील शुक्रवारी (दि. १२) परतण्याची शक्यता आहे. भारतात येणारी विमान सेवा सुरू झाल्यानंतर डॉ. पाटील यांना शुक्रवारी दुपारचे विमान बुकिंग मिळाले आहे.

### जि. प., पं.स. निवडणूक लांबणीवर जाण्याची शक्यता

मुंबई : हॅलो प्रभात

जिल्हा परिषद, पंचायत समितीचे गट आणि गण प्रारुप प्रभाग रचना अंतिम करण्यात आली आहे. त्यामुळे आरक्षण सोडत जाहीर होऊन लवकरच निवडणूक होईल, अशी शक्यता होती. मात्र, या शक्यतेला ब्रेक लागला आहे. सरकारच्या विरोधात आरक्षण सोडतीच्या आधीच नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे.

आरक्षण सोडत ही चक्रकार पद्धतीने केली जाते, मात्र, सरकारने चक्रकार पद्धत वापरली नाही, असा आक्षेप घेत याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### महादेवी हत्तीणीसंदर्भात तूर्त निर्णय नाही

कोल्हापूर : हॅलो प्रभात

कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील महादेवी उर्फ माधुरी हत्तीणीप्रकरणी आज (दि.१२) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परंतु, हत्तीणीला कोल्हापुरात परत पाठवण्यासंदर्भात तुर्त कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. हे प्रकरण उच्चस्तरीय कमिटीकडे पाठवण्यावर आज (शुक्रवार) सर्वोच्च न्यायालयात एकमत झाले.

## मतचोरीविरोधात ठामपणे लढणार : शिवराज मोरे

### मतदार यादीतील गोंधळ विरोधात लढा उभारण्याचा ठाम निर्धार

मुंबई : हॅलो प्रभात

संघटन मजबूत करून तरुणांच्या प्रश्नांवर सरकारविरोधात संघर्ष करणार असून मतदार यादीतील गोंधळ आणि मतचोरी विरोधातही युवक काँग्रेस ठामपणे लढणार आहे, असा निर्धार महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी व्यक्त केला आहे.




मुंबईतील टिळक भवन येथे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची दोन दिवसीय प्रदेश कार्यकारिणी बैठक संपन्न झाली. या बैठकीला भारतीय युवक काँग्रेसचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, प्रदेश युवक काँग्रेसचे नवनियुक अध्यक्ष शिवराज मोरे, सहप्रभारी नवज्योत सिंग संधू जी, शाम्भवी शुक्ला जी यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. मागील काळातील कामगिरीचा आढावा घेत, आगामी काळातील युवक काँग्रेसच्या कामकाजाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

यावळी बोलताना प्रभारी अजय छिकारा म्हणाले की, महाराष्ट्र युवक काँग्रेसने बूथ स्तरावर संघटन मजबूत करण्याचे काम हाती घेतले आहे. मतदार यादीतील गोंधळ आणि मतचोरीविरोधात युवक काँग्रेस लढा देईल. हा लढा लोकशाही मजबूत करण्यासाठी आहे.


या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने मतदार यादीतील गोंधळ व मतचोरीच्या विरोधात लढा उभारण्याचा ठाम निर्धार केला.

राज्यातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये युवक काँग्रेसचे कार्यकर्ते बूथ स्तरावर मतदार यादीची तपासणी करून मतदारांना न्याय देण्यासाठी सज्ज होतील. पुढील एक महिनाभर महाराष्ट्र युवक काँग्रेस बूथवार मतदार यादीवर काम करून, आवश्यक माहिती गोळा करून पुढील रणनीती आखणार असल्याचे बैठकीत जाहीर करण्यात आले.

यावेळी भारतीय युवक काँग्रेसचे नवनिर्वाचित पदाधिकारी, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती युवक काँग्रेसच्या मीडिया विभागाचे चेअरमन अक्षय जैन यांनी दिली आहे.

## आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन केंद्र उपयुक्त ठरेल : ना.पाटील

सांगली : हॅलो प्रभात



शासन व महानगरपालिका निधीतून माळबंगला सांगली येथे बांधण्यात आलेले अग्निशमन केंद्र २४ तास सुरू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्र, नजिकच्या माधवनगर ग्रामपंचायतीच्या मोठ्या असलेल्या बाजारपेठेत तसेच शेजारील ग्रामीण भागात आपत्कालिन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी हे अग्निशमन केंद्र अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे व्यक्त केला. महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियानांतर्गत माधवनगर रोड, माळबंगला सांगली येथे अग्निशमन केंद्राचे लोकार्पण, अग्निशमनासाठी अत्याधुनिक वाहने तसेच दीनदयाळ जन आजीविका योजनेंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त ९ कचरा संकलन इलेक्ट्रिक वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. विशाल पाटील, आ. इद्रिस नायकवडी, आयुक्त सत्यम गांधी, अतिरीक्त आयुक्त राहुल रोकडे, सुनील माळी, उपायुक्त स्मृती पाटील आदि उपस्थित होते.

## कायदा व सुव्यवस्था बिघडवणारे मोजकेच विरोधक

### संजय पाटील –यड्रावकर यांची भूमिका ही समाजात शांतता टिकवण्यासाठीच

जयसिंगपूर : हॅलो प्रभात



जयसिंगपूरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू आहेत. या चळवळीत विविध गावातील तरुण सहभागी होत आहेत. शहरातील सर्व समाज बांधवांनी पुतळा उभा राहावा अशी भूमिका घेतली आहे, पण सध्या जयसिंगपूरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे म्हणणारे बाहेर गावातून येणारे मोजकेच विरोधक आहेत त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय जयसिंगपूर शहरवासीय हाणून पाडतील, पुतळा उभारण्याचा निर्णय जयसिंगपूरकरांनीच घेतला आहे असा ठाम पवित्रा संजय पाटील-यड्रावकर यांनी घेतला आहे.

पुढे यड्रावकर म्हणाले, डॉ. आंबेडकरां विषयी आमच्या मनात सर्वोच्च श्रद्धा आहे. पुतळा उभा करणे हा आमच ध्यास आहे. मात्र जयसिंगपूरकरांनी बाहेरच्या गावातील लोकांनी हस्तक्षेप केल्यास स्थानिक वातावरण बिघडण्याचा धोका आहे. आंबेडकर पुतळ्याचा सन्मान व पावित्र्य जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मात्र बाहेरच्या गावातील लोक जयसिंगपूरात येऊन आंदोलन उभे करत असतील, तर त्याचा परिणाम शहरातील शांततेवर होऊ शकतो.

समाजातील व तालुक्याच्या गावागावातील घटकांनी त्यांच्या भूमिकेला पाठिंबा देत म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेबांचा विचार हा सर्वांसाठी आहेच; पण संघर्ष करताना स्थानिक प्रश्न स्थानिक लोकांनीच मार्गी लावले पाहिजेत. सद्यस्थिती पाहता, यड्रावकरांची भूमिका ही शांतता आणि सुसंवाद टिकवण्यासाठीचा प्रयत्न असल्याचे त्यांच्या समर्थकांचे मत आहे.

## विद्यार्थ्यांनी पालकांची स्वप्ने पूर्ण करावीत : अतुल चितळे

पन्हाळा : हॅलो प्रभात

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स मध्ये प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून चितळे उद्योग समूहाचे उद्योजक अतुल चितळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन पी.आर.भोसले तर प्रमुख मान्यवर म्हणून एन.आर.भोसले व प्राचार्य डॉ. संजीव जैन उपस्थित होते.




दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजीव जैन यांनी केले.

यावेळी अतुल चितळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी चारित्र्य व शिस्त जपत पालकांचा विश्वास संपादन करावा. मोबाईलचा वापर फक्त चांगल्या कामासाठी करावा आणि शिक्षकांचा आदर ठेवून पालकांची स्वप्ने पूर्ण करावीत.

चेअरमन पी.आर.भोसले यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणानंतरच्या करिअरचे नियोजन करण्याचे आणि पालकांचा अभिमान वाढवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात पालक प्रतिनिधी संदीप पांडे, संजय खाडे, स्वाती पाटील, डॉ. सोपान काळे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला प्रा. एकनाथ साळोखे, डॉ. गजानन कोळी, प्रा. राहुल नेजकर, प्रा. सचिन पिसाळ, डॉ. विनायक देवकर, प्रा. योगेश साटम, दीपक पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन महेंद्र कुलकर्णी यांनी केले.

## पेटंट विषयकच्या वैज्ञानिक सल्लागारपदी डॉ.सी.डी.लोखंडे

कोल्हापूर : हॅलो प्रभात



डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाच्या इंटरडीसीप्लेनरी स्टडीजचे अधिष्ठाता आणि संशोधन संचालक प्रा.(डॉ.) सी.डी. लोखंडे यांची भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या नियंत्रक जनरल कार्यालयातर्फे पेटंट विषयक वैज्ञानिक सल्लागार पदावर पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे.

वाणिज्य व उद्योग मंत्रालयाअंतर्गत नियंत्रक जनरल कार्यालयाने पेटंट अधिनियम, १९७० मधील कलम ११५ आणि पेटंट नियम, २००३ मधील नियम १०३ नुसार अद्ययावत वैज्ञानिक सल्लागारांची यादी प्रकाशित केली आहे. या यादीत जैवतंत्रज्ञान, रसायनशास्त्र, यांत्रिकी, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्ससह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. भारतीय पेटंट कार्यालयामार्फत पेटंट उल्लंघन प्रकरणांमध्ये न्यायालयांना तांत्रिक आणि वैज्ञानिक बाबी समजून घेण्यासाठी मदत करणाऱ्या वैज्ञानिक सल्लागारांची यादी तयार केली जाते. या यादीतील सल्लागार न्यायाधीशांना तांत्रिक बाबी समजून घेण्यास मदत करतात. वैज्ञानिक आणि तथ्याधारित अहवाल सादर करणे, तांत्रिक माहिती उपलब्ध करून देणे, न्यायनिर्णय अधिक माहितीपूर्ण आणि स्पष्ट होण्यासाठी मदत करणे आदी कार्यामध्ये मदत करतात.

या नियुक्तीबद्दल कुलपती डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष आ. सतेज डी.पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ.आर. के.शर्मा आणि कुलसचिव डॉ.व्ही.व्ही.भोसले यांनी अभिनंदन केले.

## शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर भर द्यावा : आ.जयंतराव पाटील

इस्लामपूर : हॅलो प्रभात

शिक्षकांनी समाज व पालकांशी संवाद ठेवत,शाळा व शाळा परिसरातील भौतिक सुविधाकडे लक्ष देत शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर भर द्यावा,असे आवाहन माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी केले. शिक्षकां नी कमकुवत मुलांचे पालकत्व घ्यावे,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कासेगाव येथील पदयात्री स्मारकमध्ये कासेगाव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या पतसंस्थेने शिक्षक दिनानिमित्त आयोजित संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या स्नेह मेळाव्यात ते बोलत होते. राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील, संस्थेचे अध्यक्ष शामराव पाटील,




सचिव प्राचार्य आर.डी. सावंत, सहसचिव आर.एस.जाखले, प्रशासकीय समन्वयक अँड. बी. एल. सरनोबत, देवराज पाटील, उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या कार्यकारिणीचे नूतन सदस्य संजीव पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

आ. पाटील म्हणाले, पटसंख्या वाढीसाठी शाळेची गुणवत्ता वाढवा. शिक्षण व्यवस्थेतील बदल स्वीकारा. प्रत्येक शाळा सुधारण्याचा निरंतर प्रयत्न करा. मुले नापास होतात,हे गांभीर्याने घेवून शैक्षणिक उपक्रम राबवा. प्राथमिक शाळेच्या गुणवत्ता वाढीकडेही लक्ष देऊन सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे.

प्राचार्य आर.डी.सावंत म्हणाले, शिक्षकांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून अंतर्मुख होऊन अध्यापन करावे. शिक्षकांना समाजात किंमत आहे. भविष्यात शाळा ही संकल्पना कालबाह्य होण्याची भीती आहे. यावेळी अँड.बी.एल.सरनोबत, विद्या पाटील,उत्तम सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य व्ही.डी.माने,सुभाष आडके, नुतन सदस्य संजीव पाटील, व्ही.जे.जाधव, एस डी रकटे, पतसंस्थेचे उपाध्यक्ष एन.डी. पाटील, अधिक्षक ए.डी. पाटील, तसेच पतसंस्थेचे संचालक, विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन वैशाली हांडे, विमल कुंभार यांनी केले. आभार पतसंस्थेचे अध्यक्ष हणमंत पाटील यांनी मानले.

## 'वस्त्रनगरी' त भाजपांतर्गत उमेदवारीवरून चूरस

### शिंदेसेनेची स्वबळाची तयारी : भाजपची अडचण वाढली

इचलकरंजी : हॅलो प्रभात

इचलकरंजी महापालिकेची पहिलीच निवडणूक रंगतदार ठरण्याची शक्यत आहे. दुर्बल महाविकास आघाडी राजकीय अस्तित्वासाठी झगडत आहे. तर महायुतीत मात्र कुणाचा पायपोस कुणाच्या पायात अशी स्थिति निर्माण झाली आहे. भाजपच्या स्थानिक नेत्यांनी स्वबळाचा नारा दिल्याने महायुतीत आलबेल नसल्याचे चित्र आहे. त्यातच भाजपमध्ये अंतर्गत मतभेदाने उचल खाल्ली आहे.

शिंदेसेनेने मात्र उमेदवारांची यादीच निश्चित केली आहे, तर अजितदादांच्या राष्ट्रवादीचे मौन मोठा खेळ करणार असल्याचे संकेत मिळू लागले आहेत. महायुती म्हणून निवडणुका लढल्या गेल्या नाहीत तर मतविभाजनाचा फायदा ताकद नसलेल्या महाविकास आघाडीला होऊन ती बळकट होईल असा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे. वस्त्रनगरी इचलकरंजीत महाविकास आघाडीने सुरुवातीपासूनच




एकत्र निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. महायुतीकडून मात्र अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही, त्यामुळे गोंधळ आहे. भाजपने स्वबळाचा नारा दिला असला तरी स्वबळावर निवडणूक लढली जाणार हे गृहीत धरूनच शिंदेसेनेने उमेदवारांची यादीही निश्चित केली आहे.

भाजपचा स्वबळाचा नारा अद्यापही सुरूच असल्याचे दिसून येत आहे. गणेश विसर्जन मिरवणूकीवेळी भाजप व शिवसेना यांचे स्वतंत्र स्वागत कक्ष होते. एकत्रीत स्वागत कक्ष करण्याबाबत दोन्ही पक्षात मतभेद झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे महायुतीबाबतचा गुंता वाढत जाण्याची शक्यता आहे. सध्या पितृ पंधरवडा सुरू असल्यामुळे फारशा राजकीय घडामोडी अपेक्षित नाहीत, माजी आमदार सुरेश हाळवणकर यांचे मौन भाजपला धक्का देणार का? असा प्रश्न चर्चेत आहे. त्यांच्या समर्थक इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. उमेदवारीची खात्री नसल्यामुळे गोंधळाची स्थिती आहे. भाजपमधील उमेदवारी देताना कुणाचे वर्चस्व राहणार यावरच पुढील राजकारण ठरणार आहे.

भाजपकडून स्थानिक पातळीवरील शिर्ष नेतृत्वाने काहीजणांना उमेदवारीचा शब्द दिला आहे. त्यामुळेच वर्षापासून निवडणुकीची तयारी केलेल्यांना हक्काच्या प्रभागातून उमेदवारीसाठी डावलण्याची शक्यता आहे. अशा काहीजणांना दुसरा प्रभाग शोधण्याचाही सल्ला दिला जात आहे. त्यामुळे कुणालाही सध्या १०० टक्के उमेदवारीची हमी नसल्यामुळे अस्वस्थता आहे.

इचलकरंजी महापालिकेच्या पहिल्या निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. महाविकास आघाडीने सुरवातीपासून व्यूहरचना आखण्यास सुरुवात करून एकत्र निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. मात्र शिवसेनेचा खासदार अन भाजपचा आमदार असतानाही महायुतीकडून अद्याप कोणताच निर्णय झालेला नाही. त्यामुळे महायुतीच्या राजकीय वर्तुळात अजून शांतता आहे. भाजपकडून स्वबळाचा नारा दिला असला तरी शिवसेनेने उमेदवारांची यादीच निश्चित केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे महायुती न झाल्यास भाजपचे टेन्शन शिवसेनेमुळे वाढविण्याची शक्यता आहे. यासंदर्भात भाजपच्या वरिष्ठ मंत्र्यांसोबत महायुतीसंदर्भात चर्चा होणार आहे.

लोकसभा, विधानसभेनंतर आता महापालिका निवडणुकीला महाविकास आघाडी एकसंधपणे सामोरे जात आहे. त्यासाठी आघाडीकडून व्यूहरचना आखली जात आहे. दर बुधवारी काँग्रेस भवनात बैठक घेऊन महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली जात आहे. संभाव्य उमेदवारांबाबत चाचपणी केली जात आहे. महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडी मजबूत नसली तरी त्यांच्याकडून नियोजनबध्द कार्यक्रम आखला जात आहे. त्यांचा महायुतीकडून उमेदवारी न मिळणाऱ्यांवर डोळा आहे. त्याचाही चाचपणी त्यांनी आतापासूनच सुरू केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) अद्याप महायुतीमधील जागांबाबत पत्ते खुले केलेले नाहीत. पण, शिवसेना (शिंदे गट) मात्र गतीने कामाला लागल्याचे गणेशोत्सवात दिसून आले आहे. त्यामुळे महायुती झाल्यास जागा वाटपाचा गुंता निर्माण होण्याची शक्यता आहे.




# आणि... क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली

साडेतीन वर्षापूर्वी ( ४ मार्च २०२२ ) रोजी क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज साडेतीन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्टया वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या एशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक गाटिंगला ऑफ साईडला चेंडू टाकला. गाटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे. शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्टया वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्टयांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १0 किंवा १0 पेक्षा अधिक बळी त्याने १0 वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता. शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछाडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९0 ते २0१0 असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता. निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २00८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले.

## टीईआरएन ग्रुपची २४ दशलक्ष डॉलर्सची निधी उभारणी

**मुंबई : हॅलो प्रभात**

हजारो भारतीय परिचारिका आणि काळजी घेणाऱ्या कामगारांसाठी जागतिक करिअरचे स्वप्न कराराने नव्हे तर एका कॉलिंगने सुरू होते. टीईआरएन ग्रुप हा एआय-संचालित जागतिक टॅलेंट मोबिलिटी प्लॅटफफॉर्म तो प्रवास शक्य करत आहे, आणि पूर्वीपेक्षा गतीशील, न्याय्य व अधिक पारदर्शक बनवत आहे. कंपनीने सिरीज ए फंडिंगमध्ये २४ दशलक्ष डॉलर्स निधी उभारल्याची घोषणा केली. यूकेमधील नोशन कॅपिटलने आरटीपी ग्लोबल, लोकलग्लोब, ईक्यू२ व्हेंचर्स व निओ कॅपिटल यांच्यासह, तसेच विद्यमान गुंतवणूकदार प्रीसाइट व टॉम स्टॅफर्ड, माजी एनएचएस अध्यक्ष व एएक्सए हेल्थकेअरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अनेक वरिष्ठ धोरणकर्त्यांसह या निधी फेरीचे नेतृत्व केले. या फेरीसह टीईआरएन ग्रुपचा एकूण निधी ३३ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे.

# हिन्दी : राष्ट्रभाषा नहीं राजभाषा

**हॅलो प्रभात**

**हिन्दी के ऐतिहासिक अवसर को याद करने के लिये हर साल १४ सितंबर को पूरे देश में हिन्दी दिवस मनाया जाता है। इसको हिन्दी दिवस के रुप में मनाना शुरु हुआ था क्योंकि वर्ष १९४९ में १४ सितंबर को संवैधानिक सभा के द्वारा आधिकारिक भाषा के रुप में देवनागरी लिपी में लिखी हिन्दी को स्वीकृत किया गया था।**

### हिन्दी दिवस क्यों मनाया जाता है?

देश में हिन्दी भाषा की महत्ता को प्रदर्शित करने के लिये पूरे भारत में हिन्दी दिवस मनाया जाता है। भारत में हिन्दी भाषा का बड़ा इतिहास है जो इंडों-यूरोपियन भाषा परिवार के इंडों-आर्यन शाखा से संबद्ध रखता है। भारत की सरकार ने देश की आजादी के बाद मातृभाषा को आदर्श के अनुरुप बनाने के लिये एक लक्ष्य बनाया अर्थात हिन्दी भाषा को व्याकरण और वर्तनीयुक्त करने का लक्ष्य। इसे भारत के अलावा मॉरीशस, पाकिस्तान, सुरीनाम, त्रिनिदाद और कुछ दूसरे देशों में भी हिन्दी भाषा बोली जाती है। इसे २५८ मिलीयन लोगों द्वारा मातृभाषा के रुप में बोली जाती है और ये दुनिया की ५वीं लंबी भाषा है।

### हिन्दी दिवस

१४ सितंबर प्रत्येक वर्ष एक कार्यक्रम के रूप में मनाया जाता है,क्योंकि भारत की संविधान सभा द्वारा १४ सितंबर १९४९ को हिन्दी भाषा (देवनागरी लिपि में लिखित) भारत गणराज्य की आधिकारिक भाषा के रूप में अपनाई गई थी। हिन्दी भाषा को भारत की आधिकारिक भाषा के रूप में उपयोग करने का निर्णय भारत के संविधान द्वारा (जो १९५० में २६ जनवरी को प्रभाव में आया है) वैध किया गया था। भारतीय संविधान के अनुसार, देवनागरी लिपि में लिखित हिन्दी भाषा को पहले भारत की आधिकारिक भाषा के रूप में अनुच्छेद ३४३ के तहत अपनाया गया था।

### हिन्दी दिवस पर क्रियाएँ

हिन्दी कविता, कहानी व्याख्यान, शब्दकोष प्रतियोगिता आदि से संबंधित अलग कार्यक्रम और प्रतियोगिता आयोजन के साथ हिन्दी दिवस के रुप में स्कूल, कॉलेज, कार्यालय, संस्थान और दूसरे उद्यमों में हिन्दी दिवस को मनाया जाता है। भारत में लोगों के बीच संवाद का सबसे बेहतर माध्यम हिन्दी है इसलिये इसको एक-दूसरे में प्रचारित करना चाहिये। हिन्दी विश्व में सामान्यत: दूसरी सबसे ज्यादा बोली जाने वाली भाषा है। नई दिल्ली के विज्ञान भवन में हिन्दी से संबंधित विभिन्न क्षेत्रों में श्रेष्ठता के लिये लोगों को भारत के राष्ट्रपति द्वारा इस दिन पर पुरस्कृत किया जाता है।

राजभाषा पुरस्कार विभागों, मंत्रालयों, सार्वजनिक क्षेत्र के उपक्रमों और राष्ट्रीयकृत बैंकों के लिए दिया जाता है। हिन्दी दिवस पर प्रतिवर्ष वितरित किये जाने वाले पुरस्कारों में सें दो के नाम गृह मंत्रालय द्वारा २५ मार्च २०१५ को बदल दिये गये। इंदिरा गांधी राजभाषा पुरस्कार (१९८६ में स्थापित किया गया था) को राजभाषा कीर्ति पुरस्कार और राजीव गांधी राष्ट्रीय ज्ञान विज्ञान मौलिक पुस्तक लेखन पुरस्कार को राजभाषा गौरव पुरस्कार में बदल दिया गया है।




**१४ सप्टेंबर : विश्व हिन्दी दिवस....**

### हिन्दी दिवस का जश्न

हिन्दी दिवस भारत की मातृ भाषा को सम्मान देने के लिये प्रति वर्ष मनाया जाता है। यह लोगों द्वारा सरकारी कार्यालयों, निजी कार्यालयों, और शैक्षणिक संस्थानों में मनाया जाता है। यह शिक्षकों के उचित मार्गदर्शन में विविध गतिविधियों के साथ स्कूल और कॉलेज के छात्रों द्वारा मनाया जाता है। हिन्दी दिवस पूरे देश भर में मनाया जाता है, जो भारत में सबसे व्यापक रूप से बोली जाने वाली हिन्दी भाषा के महत्व को दर्शाता है। यह बहुत सी मनोरंजक गतिविधियों की एक विशेष सभा का आयोजन करके लगभग सभी स्कूलों और कॉलेजों में छात्रों द्वारा मनाया जाता है। विभिन्न कक्षाओं के छात्रों द्वारा, भाषण का सस्वर पाठ, निबंध लेखन, हिन्दी कविता पाठ, कबीर दास के दोहे, रहीम के दोहे, तुलसी दास के दोहों का सस्वर पाठ गायन, गीत, नृत्य, हिन्दी में सामान्य ज्ञान प्रश्नोत्तरी प्रतियोगिता, नाटक, नारा लेखन आदि इस दिन की मुख्य गतिविधियों में शामिल है। इस दिन, छात्रों को विशेष रुप में हिन्दी भाषा में भाषण देने, निबन्ध लिखने और अन्य गतिविधियाँ करने के लिये प्रोत्साहित किया जाता है। स्कूलों में छोटे बच्चों को भी हिन्दी में कुछ लिखने के लिए कार्य या कुछ लाइनों का भाषण दिया जाता है। एक बहुत पुराना और प्रसिद्ध हिन्दी भजन ('ऐ मलिक तेरे बंदे हम') छात्रों द्वारा समूह में गाया जाता है।

### राष्ट्रीय भाषा दिवस

हिन्दी दिवस को मनाने के लिये विभिन्न स्कूलों द्वारा आंतरिक स्कूल प्रतियोगिताओं का आयोजन किया जाता है। विभिन्न स्कूलों के छात्रों को विविध प्रतियोगिताओं में हिस्सा लेने के लिए जैसे हिन्दी कविता का पाठ ('हिन्दी मेरी पहचान' के विषय पर आधारित) और ('एकता का सूत्र हिन्दी' विषय पर आधारित) प्रतियोगिता के लिये आमंत्रित करते हैं। स्कूलों द्वारा इस प्रकार की प्रतियोगिताओं के आयोजन छात्रों को अपने अन्दर छुपे अलग रुचिपूर्ण तरीकों के साथ हिन्दी भाषा के ज्ञान की खोज के लिये किया जाता है।

### हिन्दी दिवस का महत्व और एक कार्यक्रम के रुप में मनाने की आवश्यकता

हिन्दी हमारी मातृ भाषा है और हमें इसका आदर और सम्मान करना चाहिये। देश में तकनिकी और आर्थिक समृद्धि के एक साथ विकास के कारण, हिन्दी ने कहीं ना कहीं अपना महत्ता खो दी है। प्रत्येक क्षेत्र में सफलता पाने के लिये हर कोई अंग्रेजी को बोलना और सीखना चाहता है और इसी प्रकार की माँग भी है। हालाकिं, हमें अपनी मातृभाषा को नहीं छोडना चाहिये और इसमें भी रुचि लेनी चाहिये और सफल होने के साथ अन्य आवश्यकताओं का पूर्ति के लिये दोनों का ज्ञान एक साथ होना चाहियें। किसी भी देश की भाषा और संस्कृति किसी भी देश में लोगों को लोगों से जोडे रखने में बहुत महत्वपूर्ण भूमिका अदा करती है।

किसी भी आर्थिक रूप से संपन्न देश की मातृभाषा के पंख तेजी से बढ़ने लगते है क्योंकि अन्य देशों के लोग भी उस भाषा को सीखना चाहते हैं, हालाकिं वे ये नही सोचते कि उनकी अपनी पहचान अपना मातृभाषा और संस्कृति पर निर्भर करती है। हर भारतीय को हिन्दी भाषा को मूल्य देना चाहिए और देश में आर्थिक उन्नति का लाभ लेना चाहिये। यह प्राचीन काल से ही भारतीय इतिहास को उजागर करती है और भविष्य में हमारी पहचान की कुँजी है। यह एक बहुत ही विशाल भाषा है, जो अन्य देशों (नेपाल, त्रिनिदाद, मारीशस, आदि) के लोगों द्वारा भी बोली और अच्छी तरह से समझी जाती है। यह एक दूसरे के साथ बातचीत करने के लिए बहुत आसान और सरल साधन प्रदान करती है। यह विविध भारत को एकजुट करने में एक महत्वपूर्ण भूमिका निभाती है इसलिये संपर्क भाषा के रूप में कही जाती है। हर साल हिन्दी को सम्मान देने और इसके महत्व को अगली पीढ़ी को हस्तान्तरित करने के लिये हिन्दी दिवस बहुत बडे कार्यक्रम के रूप में मनाने की एक जरूरत है। हिन्दी दिवस का जश्न मनाना चाहिये इस लिये नहीं कि यह हमारी राजभाषा है बल्कि इसलिये भी कि यह हमारी मातृभाषा है जिसका हमें सम्मान करना चाहिये और समय समय पर स्मरणोत्सव भी मनाना चाहिये। हमें हमारी राजभाषा पर गर्व करना चाहिये और अन्य देशों में हिन्दी बोलते समय कभी भी हिचकिचाहट महसूस नहीं करना चाहिये। आजकल सभी कार्य क्षेत्रों में अंग्रेजी की बढती लोकप्रियता के कारण लोग अंग्रेजी को हिन्दी से अधिक पसन्द करते है। इस अवस्था में, हिन्दी दिवस का वार्षिकोत्सव भारतियों को गौरवावित महसूस कराता है कि एक दिन अपनी राजभाषा के लिये भी समर्पित है।

### विविध कार्यक्रमों में भाग लेना चाहिये

यह कार्यक्रम भारतियों को तहे दिल से हिन्दी भाषा के प्रचार-प्रसार का अवसर प्रदान करता है। यह उत्सव देश के युवाओं के बीच हिन्दी भाषा के बारे में उत्साह का सूत्रपात करेगा। यह युवाओं को प्रेरित करता है, और उनके बीच में हिन्दी के लिये सकारात्मक धारणा लाता है। तो, हमें हर साल बड़े उत्साह के साथ हिन्दी दिवस मनाना चाहिए, दिल से हिन्दी भाषा के महत्व को महसूस करने के लिये स्कूल, कॉलेज, समुदाय या समाज में आयोजित विविध कार्यक्रमों में सभीने भाग लेना चाहिये।

## फॅशन, फ्लेअर आणि ब्लेंडर्स प्राईडने ग्लॅमर अँड स्टाईल अवॉड्र्ससोबत केली भागीदारी

**मुंबई : हॅलो प्रभात**




ब्लेंडर्स प्राईडने फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्स २०२५ सोबत आपल्या प्रमुख भागीदारीची घोषणा केली. या दोन आयकॉनिक शक्तींच्या एकत्र येण्याने एक भव्य मंच तयार झाला आहे, जो फॅशन, स्टाईल आणि मनोरंजनातील सर्वोत्तम गोष्टींवर प्रकाशझोत टाकतो. दशकांपासून ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर द्वारे फॅशन आणि लाईफस्टाईलच्या जगात एक अविस्मरणीय शक्ती राहिले आहे.

## ओबेन इलेक्ट्रिकची 'मेगा फेस्टिव्ह उत्सव'ची घोषणा

**पुणे : हॅलो प्रभात**



भारतातील आघाडीची देशांतर्गत निर्मित आणि संशोधन आणि विकासद्वारे-प्रेरित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनी, ओबेन इलेक्ट्रिकने 'मेगा फेस्टिव्ह उत्सव' लाँच करण्याची घोषणा केली. प्रमुख इलेक्ट्रिक मोटारसायकली, रॉर ईझी सिग्मा आणि रॉर ईझी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना किंमतीत आधीच समाविष्ट केलेला २०,०००/- चा किंमतीचा लाभ, १०,०००/- पर्यंतचा अतिरिक्त कॅशबॅक आणि प्रत्येक खरेदीवर एक खात्रीशीर सोन्याचे नाणे मिळेल.

## स्मार्ट मीटर्समुळे ऊर्जा कार्यक्षमता आणि रोजगारात वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

सगळ्या गोष्टी स्मार्ट होत चालल्याने आता वीज मीटर्ससुद्धा स्मार्ट होत आहेत. यामुळे प्रामाणिक ग्राहकांना अनेक फायदे मिळत आहेत. स्महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी स्मार्ट मीटर स्वीकारणाऱ्या घरांसाठी कमी दरात वीज देण्याचे प्रोत्साहन सुरू केले आहे. वितरणातील तोटा विद्यमान १७-१८% वरून एक अंकी पातळीवर आणण्याचा प्रयत्न आहे. काही राज्यांमध्ये हा तोटा ४०% पेक्षा जास्त आहे. म्हणजेच १०० युनिट वीज दिल्यास ४० युनिट नोंदवल्या जात नाहीत त्यामुळे प्रामाणिक ग्राहकांवर अधिक भार येतो आणि वीज कंपन्यांना तोटा होतो.

# 'हिंदी दिवस' का-कुणामुळे साजरा केला जातो?

**हॅलो प्रभात**

आपण भारतात कुठेही गेलो की आपण हिंदी भाषेला प्राधान्य देतो. आपल्याला माहीत असतं समोरच्याची भाषा कुठलीही असो, त्याला हिंदी कळणारच. मग दोन वेगवेगळ्या भाषेचे लोक हिंदीवर येऊन एक होतात. आज १४ सप्टेंबर, हिंदी दिवस... हिंदी दिवस अत्यंत उत्साहात आणि आवर्जून साजरा केला जातो. ठिकठिकाणी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. पण आजच हा हिंदी दिवस साजरा का केला जातो? १४ सप्टेंबर हीच तारीख का म्हणून निवडली गेली? असं काय कारण आहे की आजच हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो? आपली अधिकृत आणि राजभाषा असलेल्या हिंदीबद्दल आपल्याला ही माहिती असायलाच हवी.

- हिंदीविषयी बोलताना महात्मा गांधी एकदा म्हणाले होते, 'हिन्दी भाषेशिवाय मी मुका आहे.'
- बाळ गंगाधर टिळक यांनीसुद्धा हिंदीविषयी मत मांडताना म्हटलं होतं, 'हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा बनू शकते, अशी इच्छा आणि विचार ठेवणाऱ्या लोकांपैकी मी एक आहे.'




आजही हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. ती राजभाषा आहे. देशातील अनेक ठिकाणी ही भाषा बोलली जाते. या भाषेला अधिकृत भाषेचा दर्जा आहे. हिंदीसाठी १४ सप्टेंबर ही तारीख खूप खास आहे. याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. पहिलं कारण आहे, व्यौहार राजेन्द्र सिंह यांचं. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हिंदीला भारतात राजभाषेचा दर्जा मिळाला. हजारीप्रसाद द्विवेदी, काका कालेलकर, मैथिली शरण गुप्ता आणि सेठ गोविंद दास यांच्यासारख्या काही जणांसोबत व्यौहार राजेन्द्र सिंह हिंदीसाठी लढले, असं इतिहास सांगतो. आज १४ सप्टेंबरला व्यौहार राजेन्द्र सिंह यांचा वाढदिवसही असतो. भारतीय राज्यघटना तयार होत असताना आपल्या संविधान सभेने १४ सप्टेंबर १९४९ रोजी हिंदी ही देशाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकारली.

हिंदी दिन पहिल्यांदा ६९ वर्षांपूर्वी १९५३ मध्ये साजरा करण्यात आला. जेव्हा २०११ मध्ये जनगणना झाली तेव्हा असं आढळून आलं की, भारतात ४३.६३ टक्के लोक हिंदी भाषिक आहेत. भारतात हिंदी प्रामुख्याने उत्तर, पश्चिम राज्यांत बोलली जाते. ज्या देशात ७०० प्रकारच्या भाषा बोलल्या जातात, जिथे राज्यघटनेतील अधिकृत भाषांच्या यादीत २२ भाषांचा समावेश झाला आहे, तिथे ४३.६३ टक्के लोकांनी हिंदी भाषेचा वापर करणे ही मोठी गोष्ट आहे. भारतीय संविधानाची पहिली अधिकृत भाषा हिंदी आणि दुसरी इंग्रजी आहे.

## सर्वाधिक बोलली जाणारी जगातील तिसरी भाषा...

**देशामध्ये हिंदी भाषेला अधिक चालना मिळावी म्हणून संपूर्ण देशात १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा केला जातो. भारत हा एक वैविध्यपूर्ण देश आहे जिथे सर्व लोक वेगवेगळ्या भाषा, वेगवेगळ्या चालीरीतींचे पालन करतात. दरम्यान देशातील ७७ टक्के लोक हिंदी बोलतात, समजतात आणि लिहितात. हिंदी ही जगातील तिसरी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा देखील आहे.**

देशात हिंदी भाषेच्या उन्नतीसाठी १४ सप्टेंबर १९४९ रोजी जेव्हा हिंदीला राजभाषेचा दर्जा देण्यात आला तेव्हा स्वातंत्र्यानंतर हिंदी दिवसांचा इतिहास पाहता येईल. त्यामुळेच दरवर्षी १४ सप्टेंबरला हिंदी दिवस साजरा केला जातो. ही तारीख सर्वप्रथम देशाचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी निवडली होती. राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या शिफारशीनंतर १९५३ पासून दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा केला जात होता.

एका भाषेला राजभाषा म्हणून घोषित करणे फार कठीण होते. कारण ब्रिटिशांच्या २०० वर्षांच्या राजवटीनंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा पहिला प्रश्न राजभाषेचा निर्माण झाला. देशात जिथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात तिथे कुठलीही एक भाषा अधिकृत भाषा म्हणून निवडणे खूप अवघड होते. अशा स्थितीत बराच विचारमंथन करून राजभाषा म्हणून हिंदीची निवड करण्यात आली. राज्यघटनेच्या कलम ३४३ (१) मध्ये देशाची अधिकृत भाषा हिंदी आणि तिची लिपी देवनागरी असेल असे नमूद करण्यात आले आहे.

### याच दिवशी म्हणजे १४ सप्टेंबरलाच 'भाषा सन्मान पुरस्कार' दिला जातो

हिंदी दिवसाचा कार्यक्रम जवळपास आठवडाभर चालतो. त्याला हिंदी पखवाडा म्हणतात. या विशेष दिवशी महाविद्यालये, शाळा अशा विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते.

या स्पर्धांमध्ये काव्य परिसंवाद, भाषण स्पर्धा, वादविवाद आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. 'भाषा सन्मान पुरस्कार' १४ सप्टेंबरलाच दिला जातो.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# हॅलो प्रभात
# सांगली-कोल्हापूर
जिल्हा विशेष ■ शनिवार, १३ सप्टेंबर २०२५






## ● संमिश्र ●

## देशिंग येथे रक्तदान शिबिराचे आयोजन



**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

देशिंग येथील सत्संग भवनात संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने सोमवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन केले असल्याचे स्थानिक ब्रांच मुखी अलका सुतार यांनी सांगितले. या शिबीरास परिसरातून निरंकारी अनुयायी मोठ्या प्रमाणात सहभाग घेणार आहेत. शिबिराचा शुभारंभ आ. रोहीत आर.पाटील यांच्या हस्ते होणार असून. हा कार्यक्रम सातारा झोनचे प्रभारी नंदकुमार झांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.रक्तदान शिबिरामध्ये रक्त संकलन -पद्मभूषण वसंतदादा पाटील ब्लड बँक सांगली व मिरज शासकीय महाविद्यालय ब्लड बँक मिरज यांच्यामार्फत होणार आहे.संत निरंकारी मंडळा मध्ये रक्तदान शिबिराची ही श्रृंखला २३ ऑक्टोबर १९८६ पासून सुरू झाली. तत्कालीन सदगुरु बाबा हरदेवसिंह जी महाराज यांनी स्वतः रक्तदान करून या अभियानाला सुरुवात केली.दरवर्षी देशभर निरंकारी मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. संत निरंकारी मिशनचा रक्तदानाचा सामाजिक पैलू मनुष्यमात्राच्या मनामध्ये मानवतावादी भावनांना निर्माण करत आहे. रक्तदान शिबिरासाठी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान या महान मानवी कार्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संत निरंकारी मिशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनंत चतुर्दशीला पोलिस बांधवांसाठी 'मानवतेचा प्रसाद'




फारुख मुल्लांची उपक्रमशीलता समाजात चर्चेचा विषय

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

धर्म-पंथ बाजूला ठेवून माणुसकी हीच खरी ओळख ठरते याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवसैनिक फारुख मुल्ला यांचा उपक्रम. अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत गेल्या अनेक वर्षांपासून पोलिस बांधवांना वेळेवर जेवण मिळत नसते. हे जाणून फारुख मुल्ला यांनी स्वतः पुढाकार घेऊन पोलिस व पोलिस मित्रांसाठी जेवणाची सोय केली. यंदाही त्यांच्या या उपक्रमाचा सुमारे तीन हजार पोलिस बांधवांनी लाभ घेतला.धर्म वेगळे असले तरी आपण सगळे एकत्र आहोत. पोलिस बांधव दिवसरात्र आपली सेवा करतात. त्यांना जेवण मिळावे म्हणून हा उपक्रम आम्ही दरवर्षी राबवतो, असे फारुख मुल्ला यांनी दैनिक हॅलो प्रभातशी बोलताना सांगितले. या उपक्रमासाठी वाहिद मुल्ला, इलायस मुल्ला, जुनेद फारुख मुल्ला, फातीमा फारुख मुल्ला, दत्तात्रय गुरव, गुंडाप्पा पाटील (पुशिरे), राजू तहसीलदार, मस्जिद बारगिर, बालगोपाल तालीम, बारा इमाम तालीम आदींचे विशेष सहकार्य लाभले. गणेशोत्सवात धार्मिकतेबरोबरच मानवतेचा संदेश देणारा फारुख मुल्ला यांचा हा उपक्रम समाजात आदर्श निर्माण करणारा ठरला आहे. मिरवणुकीच्या ताणात पोलिस बांधवांना दिलासा मिळवून देणाऱ्या या कामाची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

## सकल मराठा सेनेच्या जिल्हा प्रमुख पदी विलास पाटील



**घुणकी : हॅलो प्रभात**

घुणकी ( ता.हातकणंगले ) सकल मराठा सेना पक्षाच्या सांगली जिल्हा प्रमुख पदी विलास आनंदराव पाटील (कवठे पिराण ) यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांचे नियुक्तीचे पत्र पक्षप्रमुख प्रल्हाद दत्तात्रय तालुगडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सकल मराठा सेना पक्षाचे प्रमुख प्रल्हाद तालुगडे यांनी पक्षाची ध्येय धोरणे, आणि सध्याच्या राजकारणाचा विचार करता आपली मराठा समाजाच्या प्रति असणारी तळमळ आणि सत्ताधाऱ्यांची सध्याची भूमिका आणि आपल्या मराठा समाजाच्या हिताचे राजकारण कोणी करेल, त्याला बिनशर्त पाठिंबा दिला जाईल आणि आपल्या मराठा बांधवास आणि बहुजन समाजासाठी, ज्या ज्यावेळी कुठेही मदत लागेल, त्या त्यावेळी सकल मराठा सेना पक्ष अग्रक्रमी भूमिका घेईल. ते पुढे म्हणाले, यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी नूतन अध्यक्षांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि कार्यकर्त्यांनी ही आपल्या सोबत असल्याचे सामुदायिक वचन देण्यात आले. यावेळी प्रामुख्याने राज्य उपाध्यक्ष विजय पाटील, सौ.विमल पाटील, जगनाथ पाटील, तानाजी पाटील, किसान पाटील, प्रतीक पाटील, शुभम जाखले, संस्कार पाटील, योगेश पाटील, वसंत चव्हाण, नेथे भाऊजी, शिवप्रसाद, रमेश सूर्यवंशी, गोरख पाटील उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ; जीएसटी रचनेत सुधारणा

## कृषी अवजारांवर आता केवळ ५ टक्के कर

**कवठेमहांकाळ : जालिंदर शिंदे**

शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारने वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी प्रणालीत एक मोठा बदल केला असुन,१२ टक्के व २८ टक्के करस्लॅब रद्द करून आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच दर ठेवण्यात आले आहेत.




ही सुधारणा आता २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. त्यामुळे बळीराजाला चांगलाच दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने उचललेल्या या पावलामुळे देशभरात कृषी यांत्रिकीकरणाला आता चालना मिळेल,

उत्पादकता वाढेल आणि कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक बनेल.याशिवाय शेतमालाचा खर्च कमी झाल्यास बाजारात वस्तूंचे दर नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षणीय प्रमाणात कमी होईल. सिंचन व शेतीतील तांत्रिक साधनांची खरेदी आता तुलनेने स्वस्त होणार असल्याने शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेषतः दुष्काळग्रस्त किंवा मर्यादित सिंचन असलेल्या भागातील शेतकऱ्यांना ठिबक व सूक्ष्म सिंचन साधने कमी दरात उपलब्ध होणार आहेत.

### कृषी क्षेत्रावर थेट परिणाम

या बदलाचा सर्वाधिक फायदा हा कृषी क्षेत्राला होणार आहे.आतापर्यंत १८ टक्के जीएसटी भरावा लागणाऱ्या महत्त्वाच्या कृषी अवजारांवर आता फक्त ५ टक्के कर लागू होईल.यात ट्रॅक्टर व त्यांचे टायर्स,विशिष्ट जैव कीडनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये,ठिबक व सूक्ष्म सिंचन साहित्य,फवारणी पंप, शेती,बागायती व वनीकरणासाठी माती तयार करणारी यंत्रे, मशागत,कापणी व मळणी यंत्रे यांचा समावेश आहे.



जीएसटीचा दर कमी झाल्यामुळे शेतकर्यांना ट्रॅक्टरचे पार्ट,फवारणी पंप किंवा ठिबक साहित्य घेणं स्वस्त होईल.शेतीत लागणारा खर्च कमी झाला तर पिकाचा नफा थोडाफार वाढेल, तरी त्याचा दीर्घकालीन परिणाम शेतमालाच्या दरांवर आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कसा होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

– मधुकर शिंदे. प्रगतशील शेतकरी

# आ.जयंत पाटील यांची साखर पेरणी सुरु

**जत : हॅलो प्रभात**

### महादेव हिंगमिरे यांचा लवकरच राष्ट्रवादीत प्रवेश : आ.पडळकर यांना धक्का



जत तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक महादेव हिंगमिरे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. त्यांच्यासोबत जत उत्तर भागातील प्रमुख नेत्यांबरोबर आणि तालुक्यातील अनेक मान्यवर नेते राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत.जत येथील प्रसिद्ध व्यवसायिक तथा आवंढी विकास सोसायटीचे चेअरमन लक्ष्मण कोडग यांच्या घरी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि माजी जलसंपदा मंत्री आ.जयंत पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी कोडग यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत उद्योजक हिंगमिरे यांच्या प्रवेशाबद्दल आ.जयंत पाटील यांच्यासोबत प्राथमिक चर्चा झाली.तसेच याच ठिकाणी दोघांची बंद दाराआड सुमारे २० मिनिटे चर्चा झाली. चर्चेचा तपशील समजला नसला तरी उद्योजक हिंगमिरे यांना मोठे पाठबळ आ.पाटील देणार असल्याचे समजते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील, कार्याध्यक्ष बाळासाहेब पाटील, सुरेश शिंदे सरकार, जिल्हा बँकेचे संचालक मन्सूर खतीब, विवेक कोकरे, सहाय्यक निबंधक अमोल डफळे, माजी सरपंच आण्णासाहेब कोडग, उद्योजक बबन कोडग आदी उपस्थित होते.

## पूरपरिस्थितीच्या नुकसान भरपाईची कार्यवाही सुरू : जिल्हाधिकारी

**सांगली : हॅलो प्रभात**



ऑगस्ट २०२५ मध्ये सांगली जिल्ह्यात उद्भवलेली पूरपरिस्थिती पाहता, शेतीपिके व फळपिके, घर पडझड, गोठ्याचे नुकसान, व्यावसायिकांची दुकाने, गॅरेज, तसेच घरात पाणी शिरुन भांडी व कपड्याचे नुकसान झालेले आहे. या नागरिकांच्या पाठिशी शासन व प्रशासन असून, पंचनामे व नुकसानभरपाईची कार्यवाही सुरू असल्याचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, ऑगस्ट २०२५ मध्ये जिल्ह्यात उद्भ वलेल्या पूरपरिस्थितीच्या अनुषंगाने शेतीपीक व फळपीक पंचनामे करून अहवाल सादर करण्यात आला आहे. घरांची पडझड व गोठ्यांच्या नुकसानीच्या अनुषंगाने तालुका स्तरावर पंचनामे करण्यात आले असून, बांधकाम विभागाकडून प्राप्त होणाऱ्या मूल्यांकनाचे आधारे अनुदान वितरण करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

# सावळज मंडळामध्ये महसूल विभागाचा सेवा पंधरवडा

**सावळज : हॅलो प्रभात**

### महसूल विभागाचा टप्प्याटप्प्याने उपक्रम

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा सावळज मंडळामध्ये राबविण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबरपासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबरपर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे. अशी माहिती सावळज मंडळाचे मंडल अधिकारी रविकिरण वेदपाठक यांनी दिली आहे.सावळज मंडळामधील सहा गावात सावळज, अंजनी, नागेवाडी, वडगाव, लोकरेवाडी, डोंगरसोनी व सिद्धेवाडी या गावांमध्ये अभियान चालविण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित शिवार/पाणंद रस्ते आणि गृहनिर्माण उपक्रमांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

या मोहिमेचा पहिला टप्पा १७ ते २२ सप्टेंबरदरम्यान पाणंद रस्ते मोहीम या स्वरूपात होणार असून विशेष ग्रामसभा व शिवार फेरीच्या माध्यमातून नकाशावर असणारे व नकाशावर नसणारे असे सर्व रस्ते नकाशावर सीमांकन करणे व सातबारा सदरी नोंद घेणे. अतिक्रमित रस्त्यांच्या बाबतीत रस्ता अदालत घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढतील. दुसरा टप्पा २३ ते २७ सप्टेंबरदरम्यान सर्वांसाठी घरे मोहिमेचा असून यात अतिक्रमित बांधकामांचे सर्वेक्षण, गावठाण विस्तारातील शिल्लक भूखंडांची माहिती, पात्र घरकुल लाभार्थ्यांची यादी तयार करणे, प्रस्ताव संकलन व त्यांची समितीकडे सादरीकरण ही कामे होतील.तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत.

या उपक्रमातून पाणंद रस्त्यांचा दर्जा उंचावणे, शेत रस्त्याचे वाद कायमस्वरूपी संपवणे, घरकुल पात्र लाभार्थ्यांची निवड, अतिक्रमण प्रश्न निकाली काढणे, गावठाण विस्तार योजनेतील भूखंडांचा वापर, पाणीपुरवठा साधनांची नोंदणी, भटक्या विमुक्त जातींना दाखले, तसेच पात्र शिधापत्रिका धारकांना धान्य सुरु करून देणे अशा अनेक सेवा नागरिकांना एकाच छत्राखाली मिळणार आहेत. या अभियानाचा लाभ सर्व संबंधित नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मंडळ अधिकारी रवी वेदपाठक आणि ग्राम महसूल अधिकारी अजित बनसोडे यांनी केले आहे.

## घरफोडी केलेल्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सरनाईक कॉलनी (टाकाळा) येथील बंद बंगल्यातील घरफोडी-चोरी उघडकीस आणत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने तीन आरोपींना गजाआड केले. या कारवाईत दोन एलईडी टीव्हीसह चांदीच्या मूर्ती, नाणी, पितळ व तांब्याची भांडी आणि रोख रक्कम असा सुमारे ३.१३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. फिर्यादी समरजितसिंह पाटील यांच्या आजींच्या 'प्रिया बंगल्या'त ६ ते ९ सप्टेंबर दरम्यान ही चोरी झाली होती. गुप्त माहितीच्या आधारे पोलीस पथकाने कणेरीवाडी येथे सापळा लावून आदित्य दिंडे, वैभव कांबळे व सुमित जाधव या तिघांना पकडले. चौकशीतून उर्वरित दोन साथीदार अल्पवयीन असल्याचे उघड झाले. ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांच्या पथकाने केली.

## जिवनाला योग्य दिशा दाखवणाराच खरा गुरु होय : आर्या पाटील

**चिंचणी : हॅलो प्रभात**

### श्री शिवाजी हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात



शिक्षक दिन हा दिवस फक्त औपचारिक नाही, तर आपल्या जीवनाला योग्य दिशा दाखवणाऱ्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षक म्हणजे केवळ धडे शिकवणारे नसतात, तर ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतात. तुमचे प्रेम, आदर आणि विश्वास हाच शिक्षकांना नेहमी प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन विद्यार्थी मुख्याध्यापिका आर्या पाटील हिने केले. कडेगांव तालुक्यातील चिंचणी ( अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूल, मध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी ती बोलत होती. यावेळी मुख्याध्यापक अरुण सावंत, पर्यवेक्षक सतीश मेटकरी हे प्रमुख उपस्थित होते.या प्रसंगी मुख्याध्यापिका आर्या पाटील, उपमुख्याध्यापक वरद मांडके,पर्यवेक्षक प्रिती माने तसेच इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून शिक्षक दिनानिमित्त एकदिवसीय जबाबदारी पार पाडली.

यावेळी शिक्षक मनोगत सी.डी.शिंगाडे,राहुल कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रणव जाधव,मंदार जाधव,श्रावणी पालकर,वरद मांडके, आर्या पाटील या विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी आपल्या भावना मनोगतातून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरा शिर्के हिने केले. प्रास्ताविक प्रिया सोळवंडे पाटील हिने केले. तर आभार अवनती कुंभार हिने मानले.

### 'विवेकानंद'च्या प्रा.सुप्रिया पाटील यांना इंग्रजी विषयात पीएच.डी.

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेजच्या प्रा. सुप्रिया मोहन पाटील यांना शिवाजी विद्यापीठाने Form as Statement: Study of Narrative Structures and Strategies in nita Nair's Selected Novels या प्रबंधावर इंग्रजी विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या संशोधनाला परीक्षकांकडून विशेष कौतुक मिळाले.या संशोधनासाठी प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन, तसेच कुटुंबीय, महाविद्यालय व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे . डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले . विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार, डॉ.श्रुती जोशी आणि डॉ.कविता तिवडे, वडील मोहन पाटील, आई सौ. आशालता पाटील, बंधू मिथिलेश पाटील व मित्र परिवाराचे सहकार्य लाभले.

## पिंपळे गुरव येथे राजे उमाजी नाईक जयंती साजरी

**पिंपळे गुरव : हॅलो प्रभात**

जय मल्हार क्रांती संघटना पिंपरी चिंचवड यांच्या वतीने आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी जयंती पिंपळे गुरव येथे साजरी करण्यात आली.यावेळी क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस जय मल्हार क्रांती संघटना अध्यक्ष सुभाष जाधव व संजय मराठे संजय गांधी निराधार योजना सदस्य यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढणारे महाराष्ट्रातील आद्यक्रांतिकारक आणि भारतीय स्वातंत्र लढ्यातील प्रथम सशत्र क्रांतीकारक मानले जातात. त्यामुळे सालाबादाप्रमाणे जय मल्हार क्रांती संघटना प्रदेश अध्यक्ष व राजे उमाजी नाईक महामंडळ अध्यक्ष दौलत नाना शितोळे ह्यांचा नेतृत्व खाली ही जयंती साजरी केली जाते. याप्रसंगी उमाजी नाईक यांच्या कार्याविषयी बोलतांना जाधव म्हणाले की,भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत .

# जिल्हा बँकेच्या विविध योजनांचा लाभ घ्या : साजीद मुलाणी

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**



जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी वाघ यांचे संकल्पनेतून प्रत्येक गावामध्ये ग्रामस्तरीय मेळाव्याचे आयोजन केले जात आहे. त्याच धर्तीवर तिसंगी (ता.कवठेमहांकाळ) येथेही बँकेच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात ग्रामस्तरीय मेळावा पार पडला. यावेळी मुख्य कार्यालयातील अधिकारी साजीद मुलाणी मार्गदर्शन करताना म्हणाले की, शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा उपलब्ध व्हावा म्हणून इतर शेतीपूरक व्यवसाय करावेत जेणेकरून आपली आर्थिक स्थिती भक्कम होण्यास मदत होईल.यासाठी बँकेमार्फत शेती व बिगर शेती कर्जपुरावठा केला जात आहे.त्याचबरोबर अशा प्रकल्पाना शासनाच्या विविध योजने अंतर्गत अनुदान उपलब्ध होत आहे. यामध्ये विविध विकास महामंडळे,मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अशा विविध योजनेंतर्गत व्याज परतावा अथवा अनुदान उपलब्ध होत असून त्याचा लाभ पात्र शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन केले. यावेळी उपस्थित ग्राहकांना मान्यवरांच्या हस्ते नवीन एटीएम कार्ड,पासबुक,क्यू आर कोड वितरित करणेत आले. यावेळी सरपंच रोहीणी सावळे, मुख्य कार्यालयाकडील साजीद मुलाणी,शाखा निरीक्षक दिनकर पाटील,शाखाधिकारी शिरीष स्वामी, जेष्ठ नेते तानाजी कदम, ग्रामपंचायत सदस्य,तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी,शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी शाखा व्यवस्थापक शिरीष स्वामी यांनी आभार मानले.

# वीज दराबाबत महावितरणकडून ग्राहकांची घोर फसवणुक : किरण तारळेकर

## महावितरणच्या गलथान कारभाराचा ग्राहकांना फटका

**विटा : हॅलो प्रभात**

महावितरणची अतिरीक्त वीज गळती,गलथान कारभार व नियामक आयोगाच्या धरसोड धोरणामुळे राज्यात जुलैपासुन वाढलेले वीज दर लपवीण्यासाठी महावितरणने जुलैच्या वीज बिलात विविध वर्गाच्या ग्राहक वर्गवारीनुसार उणे (-)(मायनस) २४ ते उणे ६५ पैसे इंधन अधिकाराची आकारणी केली होती. उच्च दाब ग्राहकांना जुलैला उणे (-)६५ पैसे असलेला अधिभार ागस्टच्या बिलात +३५ पैसे आकारण्यात आला असुन यामुळे लाखो युनिटचा वापर करणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना एक महिण्यात तब्बल १ रु युनिटच्या दरवाढीने लाखो रुपयांचा जबर फटका बसलेला आहे.



२७ अश्वशक्तीच्या आतील छोट्या यंत्रमाग ग्राहकांना जुलैमध्ये उणे (-)२५ पैसे आकारणी केली होती ती आता +१२ पैसे युनिटला आकारली आहे अर्थात प्रती युनिट ३७ पैसे अतिरीक्त दरवाढ लादली गेली आहे.राज्य शासन व महावितरने सरळ सरळ वीज ग्राहकांची दिशाभूल केली आहे. उर्जा मंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जुलैपासुन राज्यातील वीजेचे दर कमी होणार असल्याची घोषणा वारंवार केली होती, ती आता खोटी व दिशाभुल करणारी असल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. राज्य शासन व महावितरणच्या या फसवणुक करण्याच्या धोरणाबाबत राज्यातील औद्योगीक,व्यावसायीक वीज ग्राहकांकडून तिव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

महावितरणची अतिरीक्त गळती व अकार्यक्षम कारभाराचा मोठा फटका वीज ग्राहकांना बसत आहे. एका बाजुला अमेरीकन टेरीफ वाढीने वस्त्रोद्योगासह सर्वच उद्योग क्षेत्रात आपला निर्यातक्षम माल कुठे विकायचा ही चिंता असताना राज्य शासनाच्या या झटक्याने व उत्पादन खर्चाची वाढीने उद्योग क्षेत्रातून कमालीची चिंता व्यक्त केली जात आहे.

# सांगलीत होणार आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय हँडबॉलपटूंचा सत्कार

**सांगली : हॅलो प्रभात**

सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ या दोन वर्षातील आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय हँडबॉलपटू, त्यांचे संघ व्यवस्थापक, प्रशिक्षण यांचा सत्कार सांगली डिस्ट्रिक्ट हँडबॉल असोसिएशनच्या वतीने रविवार दि. १४ सप्टेंबर रोजी संघटनेचे कार्यालय 'विष्णू अण्णा भवन' जिल्हा परिषदे समोर येथे करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या अध्यक्षा जयश्री पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

१४ सप्टेंबर रोजी हँडबॉल संघटनेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा होत असून यामध्ये वार्षिक अहवाल, लेखाविवरण पत्रे मंजुरी, अंदाजपत्रक मंजुरी, हिशोब तपासणीस नेमणूक असे नियमित विषयांबरोबर प्रीमियर लीग स्पर्धा संयोजन, संघटनेची वेबसाईट करणे असे निर्णय होण्याची शक्यता आहे.




सभेसाठी हँडबॉल असोसिएशन इंडियाचे सहसचिव रुपेश मोरे आणि हँडबॉल असोसिएशन महाराष्ट्राचे महासचिव राजाराम राऊत हे निरीक्षक म्हणून उपस्थित राहणार असून सभेनंतर या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय खेळाडू त्यांचे प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात दोन वर्षातील ३ आंतरराष्ट्रीय हँडबॉलपटू, २५ राष्ट्रीय हँडबॉलपटू आणि ११ प्रशिक्षकांचा सत्कार होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संघटनेच्या अध्यक्षा जयश्री पाटील या भूषविणार असून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे, विष्णू अण्णा खरेदी विक्री संघाचे चेअरमन संग्राम पाटील, ज्येष्ठ शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सिद्राम चव्हाण, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, माजी नगरसेवक संतोष पाटील आणि आनंद लेंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

सन २०२३-२४ या वर्षात सांगली जिल्ह्याच्या जुनियर मुले, सब ज्युनिअर मुली, मिनी मुले-मुली संघांनी तर २०२४-२५ या वर्षात पुरुषगट ज्युनिअर मुले आणि सब ज्युनिअर मुलींनी राज्य अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे.




# क्रांती स्कूलच्या खेळाडूंचे बॉक्सिंग व तायक्वांदो स्पर्धेत यश

**कुंडल : हॅलो प्रभात**

येथील क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सांगली यांच्यावतीने सांगली जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन व सांगली मिरज कुपवाड शहर बॉक्सिंग असोसिएशन यांच्या नियोजनातून घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत श्रुती राजमाने या विद्यार्थिनीची विभागीय स्पर्धेसाठी तर अनन्या पवार हिचे तायक्वांदो या क्रीडा प्रकारासाठी निवड झाली आहे.

सांगली जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन रिंग मध्ये संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सांगली जिल्ह्यातील विविध शाळांमधील सुमारे ३५० हुन अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या इयत्ता १०वी मध्ये शिकत असणारी श्रुती राजमाने हिने शिराळा, वाळवा, इस्लामपूर, आष्टा येथील शाळेच्या खेळाडूंना पराजित करून १९ वर्षी वयोगटात ७० ते ७५ किलो वजनी गटांमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले तर इयत्ता ७ वी मध्ये शिकत असणारी राबिया कोकणे हिने रौप्य पदक प्राप्त केले. सुवर्णपदक प्राप्त खेळाडूंची निवड कोल्हापूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी झालेली आहे तसेच शालेय १७ वर्षे मुलांच्या बॉक्सिंग स्पर्धेत इयत्ता ७ वी मध्ये शिकणारा विद्यार्थी आयुष् देशमुख याने सेमी फायनल मध्ये रौप्य पदक प्राप्त केले.

सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक गणेश यादव यांनी मार्गदर्शन केले. या यशस्वी खेळाडूंचे शाळेचे चेअरमन किरण लाड, सीईओ रणजित लाड, प्राचार्या रूपाली शहा, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# कडेगाव महसूल लोक अदालतीत रस्त्यांचे प्रश्न मिटवले

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

येथील तहसील कार्यालयातील सभागृहात महसूल लोक अदालतीमध्ये रस्त्यांचे प्रश्न मिटविण्यात आले. एकूण ८ प्रकरणामध्ये रस्त्यांचा वाद आपसांत समजूतीने/तडजोडीने मिटल्याने एकूण ११६ शेतक-यांना महसूल लोक अदालतीचा फायदा झाला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून व जिल्हाधिकारी अशोक काकडे यांचे मार्गदर्शनाखाली कडेगाव तालूक्यात प्रलंबित रस्ता केसेस संदर्भात प्रांताधिकारी शिवाजी जगताप यांचे अध्यक्षतेखाली तहसिलदार अजित शेलार यांचे उपस्थितीत बुधवार दि १० सप्टेंबर रोजी तहसिल कार्यालय कडेगाव येथील सभागृहात महसूल लोक अदालती चे आयोजन करणेत आलेले होते. सदरचे लोकअदालतीस कडेगाव तालूका वकील संघटना अध्यक्ष ॲड.किरण उथळे व कडेगाव तालूका वकील संघटना सचिव मनोज तानाजी देशमुख यांचेसह सर्व वकील बांधव उपस्थितीत होते. सर्वप्रथम सर्वांच्या स्वागताचा औपचारीक कार्यक्रम घेउन प्रत्यक्ष महसूल लोक अदालतीचे कामकाजास सुरवात करणेत आली.



सदरचे महसूल लोक अदालतीमध्ये तहसिल कार्यालयातील एकूण - २१ व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील एकूण ८ अशा एकूण २९ केसेसमधील रस्ता वाद आपसांत समजूतीने / तडजोडीने मिटविण्यासाठी प्रशासनाचे वतीने प्रयत्न केला गेला. सदरचे महसूल लोक अदालतीमध्ये तहसिलदार यांचेकडील एकूण - ८ केसेसमधील रस्त्यांचा वाद आपसांत समजूतीने/तडजोडीने मिटल्याने एकूण ११६ शेतक-यांना महसूल लोक अदालतीचा फायदा झाला. महसूल लोक अदालतीमुळे शेतक-यांचा आर्थीक, मानसिक त्रास कमी झाल्याने वेळ व पैशाची बचत झाल्याने त्यांच्यात आनंद दिसून आला. महसूल लोक अदालतीमध्ये समजूतीने वाद मिटविलेल्या सर्व शेतकऱ्यांचे प्रशासनाचे वतीने अभिनंदन करणेत आले. सदरचे महसूल लोक अदालतीमध्ये कडेगाव तालूक्यातील २० गावातील एकूण-२३० शेतक-यांनी उपस्थित राहून महसूल लोक अदालतीमध्ये आपला रस्त्याचा वाद मिटविण्यासाठी उत्स्फुर्त प्रतिसाद दर्शविला.

# रंजना शेळके-ओलेकर यांना विद्यापीठाची पीएच. डी.

**भुदरगड : हॅलो प्रभात**

श्री मौनी विद्यापीठ संचलित कर्मवीर हिरे महाविद्यालय बी.ए.बी.एड. विभागातील प्रा. सौ. रंजना शेळके-ओलेकर यांना शिवाजी विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखा शिक्षणशास्त्र विषयातील 'प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सृजनशील कौशल्ये वृद्धीसाठी अध्यापन कार्यनीतींचे विकसन' हा शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला होता.



त्यांना एस.पी.एस कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली येथील डॉ. युवराज पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष आ.सतेज पाटील, चेअरमन मधुकरआप्पा देसाई, महासंचालक नाबार्डचे डॉ. यशवंतराव थोरात, संचालक डॉ. पी. बी. पाटील यांची प्रेरणा लाभली. प्राचार्य प्रा. डॉ. यु. आर. शिंदे, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, डॉ. शशिकांत चव्हाण, प्रा. शारदा पाटील यांचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले.

# महावितरणच्या ग्राहक मेळाव्यांचा ३५५ ग्राहकांनी घेतला लाभ

### वीज ग्राहकांच्या ३३४ तक्रारींचा जाग्यावर निपटारा

**सांगली : हॅलो प्रभात**

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत उपविभागीय स्तरापर्यंतचे ग्राहक मेळावे घेण्याचे निर्देश कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी दिले होते. बुधवार (दि.१०) रोजी शाखा कार्यालयांपर्यंत एकूण ८१ ठिकाणी मेळावे घेण्यात आले. त्या मेळाव्यांचा लाभ जिल्ह्यातील ३५५ ग्राहकांनी घेतला. यापैकी ३३४ ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा जागेवर करण्यात आला. तर प्रलंबित २१ तक्रारीं विहित वेळेत निकाली काढण्याचे आदेश सांगली मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अमित बोकील यांनी दिले आहेत. तक्रारींचा निपटारा झाल्याने सदर मेळाव्यांप्रती ग्राहकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.



यावेळी सांगली शहर विभागात ६ ठिकाणच्या मेळाव्यांमध्ये प्राप्त ८६ पैकी ८६ तक्रारी, सांगली ग्रामीण विभागातील ३२ ठिकाणच्या मेळाव्यांमध्ये १०२ पैकी ९१ तक्रारी, इस्लामपूर विभागातील २१ ठिकाणच्या मेळाव्यांमध्ये ४० पैकी ४० तक्रारी, विटा विभागातील १३ ठिकाणच्या मेळाव्यांमध्ये ८० पैकी ७४ तक्रारी, कवठेमहांकाळ विभागातील ९ ठिकाणच्या मेळाव्यांमध्ये ४७ पैकी ४३ तक्रारी जागेवर तात्काळ सोडवण्यात आल्या. ग्राहक मेळाव्यांदिवशी सांगली जिल्ह्यातील कार्यालयांतर्गत एका दिवसात वीज कनेक्शन हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये एका दिवसात ग्राहकांचे वीज पुरवठा करण्याबाबतचे अर्ज शाखा कार्यालयात स्वीकारून त्याच दिवशी त्यांचे कनेक्शन मीटर देऊन नविन वीजजोडणी देण्यात आली. यामध्ये सांगली ग्रामीण विभागात ६, इस्लामपूर विभागात ११, कवठेमहांकाळ विभागात ३ तर विटा विभागात २ अशा एकुण २२ वीजजोडण्या या ग्राहक मेळाव्यादरम्यान देण्यात आल्या.

# राजे रामराव महाविद्यालयातील चार प्राध्यापक सेट परीक्षेत उत्तीर्ण

**जत : हॅलो प्रभात**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत घेण्यात आलेल्या राज्य पात्रता परिक्षा म्हणजेच सेट परीक्षेत राजे रामराव महाविद्यालय,जत येथील चार प्राध्यापक उत्तीर्ण झाले असून या सर्व यशस्वी प्राध्यापकांचा सत्कार प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांच्या हस्ते व स्टाफ सेक्रेटरी डॉ.रामदास बनसोडे व डॉ.प्रकाश उर्फ मल्लापा सज्जन यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



यावेळी प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी सर्व उत्तीर्ण प्राध्यापकांचे अभिनंदन आणि कौतुक करुन पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. १५ जून २०२५ रोजी राज्य पात्रता परीक्षा सेट संपूर्ण महाराष्ट्रात घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच संकेतस्थळावर जाहीर झाला असून त्यामध्ये रसायनशास्त्र या विषयातून डॉ.राजेश सावंत व प्राध्यापिका कु. अश्विनी अरविंद पवार, संख्याशास्त्र विषयातून प्रा.अजिंक्य करांडे, कॉमर्स मधून प्राध्यापिका एस.एच.देशमुख हे उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी प्राध्यापकांचा सत्कार करुन महाविद्यालयाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.महादेव करेनव्वर, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा.कृष्णा रानगर, मराठी विभाग प्रमुख प्रा.कुमार इंगळे, डॉ. अरविंद पवार, डॉ.भिमाशंकर डहाळके, प्रा.वैभव चांदवले, प्रा.सोमनाथ करांडे यांसह महाविद्यालयातील विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद उपस्थित होते.



# प्राथमिक शाळेतूनच अनेक यशस्वी विद्यार्थी घडले

### तहसिलदार गणेश लवे

**शिराळा : नारायण घोडे पाटील**

जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणाने विद्यार्थी घडविण्यात शिक्षक ही नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावत असतात. प्राथमिक स्तरावर मिळालेल्या ज्ञानानेच परिपक्व होऊन अनेक यशस्वीवंत घडले आहेत . त्याचं प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषदांच्याच शाळेत झाले असल्याचे प्रतिपादन शाहूवाडीचे तहसीलदार गणेश लवे यांनी केले .

नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनाचे औचित्य साधून इंटरनॅशनल लायन्स क्लब आकुर्डी पुणे यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा अंत्री खुर्द शाळेचे पात्र पदवीधर शिक्षक विश्वास कुंभार यांनाआदर्श शिक्षक पुरस्कार वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी इंटरनॅशनल लायन्स क्लबचे डिस्टिक एज्युकेशन चेअरपर्सन डॉ बाबुराव सागावकर ,राष्ट्रपती पदक विजेते सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक बाजीराव पाटील , लायन्स क्लबचे डिस्ट्रिक मेंबर निलेश चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती .

शाहूवाडी तालुका शैक्षणिक व्यासपीठाचे संस्थापक अध्यक्ष विनायक हिरवे यांनी प्रास्ताविक केले .

कार्यक्रमास केंद्रप्रमुख सुधा पाटील, श्री मदने, जन उत्कर्ष ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन शांताराम जाधव ,आनंदा गुरव, बी वाय पाटील पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन संपतराव पाटील आदींच्या सह शिक्षक, शिक्षिका, ग्रामस्थ विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेत अमृता नांगरे प्रथम

## आ.जयंतराव पाटील, प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते बक्षिस वितरण

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

उरूण इस्लामपूर शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेत अमृता नांगरे यांनी प्रथम,संजना पतंगे यांनी द्वितीय,तर ऋतुजा मुसळे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला आहे. येथील निर्मला सांस्कृतिक कार्यालयात हजारो महिलांच्या साक्षीने माजी मंत्री आ.जयंतराव पाटील,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले. शहराध्यक्षा पुष्पलता खरात व महिला कार्यकर्त्यांनी स्पर्धेचे उत्कृष्ठ नियोजन केले.




आ.पाटील म्हणाले, या स्पर्धेतील महिलां चा उत्स्फूर्त प्रतिसाद कौतुकास्पद आहे. महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यावर आमचा भर आहे. आपण शहरातील बंद सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्यास पोलीस खात्यास २ लाख ५० हजार रुपये दिले आहेत. शहरातील नागरिक व महिलांची सुरक्षितता महत्वाची आहे. पुष्पलता खरात म्हणाल्या,आम्ही आ.जयंतराव पाटील,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच वर्षापासून ही स्पर्धा घेत आहोत. राजाराम बापू ज्ञान प्रबोधिनी व जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानचे आम्हास सहकार्य लाभले आहे. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब पाटील,माजी नगराध्यक्षा अरुणा देवी पाटील,महिला तालुकध्यक्षा सुनिता देशमाने,संचालक शैलेश पाटील,प्रिती लोळगे, शैलेजा जाधव,वैशाली पाटील,मालन वाकळे, माया जाधव,सुवासिनी जंगम,प्रा.स्वाती चौधरी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा.शामराव पाटील,खंडेराव जाधव, बाळासाहेब पाटील,सुभाषराव सुर्यवंशी, शंकरराव चव्हाण,सुनिता संपकाळ,रुपाली जाधव,शुभांगी शेळके,जयश्री पाटील,लता कुर्लेकर,प्रतिभा पाटील,इंदूताई मोरे यांच्यासह शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्या व गृहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.उपाध्यक्षा मनिषा पेठकर,गीता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रियांका साळुंखे यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा निकाल**

**चौथा क्रमांक-स्नेहल पाटील, पाचवा क्रमांक- विद्या साळुंखे, विशेष प्राविण्य-लक्ष्मी ताटे, कुसुम पाटील, शर्मिला बिचकर, शारदा डुबल, प्राची रावळ, दिपाली पाटील, साधना लोहार, सविता कांबळे, उत्तेजनार्थ-सुरेखा कुटेकोमल सन्मुख, संगिता कांबळे, सविता नांगरे, ऋतुजा थोरात, शारदा कदम, मेघा खांडके, ज्योती कदम, स्वाती माने, स्नेहा हाके, सलाम जमादार.**

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ शनिवार, १३ सप्टेंबर २०२५





## ‘संजीवनी’च्या कोल्हे आणि गोंदकर यांना ‘एमयुएन’स्पर्धेत पुरस्कार

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

शिर्डी येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या ११ विद्यार्थ्यांनी बेंगळूर येथील जैन इंटरनॅशल स्कूलने आयोजीत केलेल्या मॉडेल युनायटेड नेशन्स (एमयुएन) या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवीला. प्रतिभा संपन्नता आणि सफाईदार देहबोलीचे दर्शन घडवित त्यातील दोन विद्यार्थीनींनी उत्कृष्ट प्रतिनीधीत्व पुरस्कार प्राप्त केला.

त्यात राजविका अमित कोल्हे आणि तन्वी अतुल गोंदकर यांचा समावेश आहे. अशी माहिति संस्थेच्या संचालिका डॉ.मनाली कोल्हे यांनी दिली. त्या म्हणाल्या, या सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेत लिटरेचर चाप्टर एक्स या कमिटी अंतर्गत राजविकाने ‘अनाबेथ चेस’ यांची भूमिका साकारली. तन्वीने मेडूसाची भूमिका साकारली. या दोघींच्या भूमिका लक्षवेधी ठरल्याने त्यांना वरील पुरस्कार मिळाला.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संयुक्त राष्ट्र संघातील विविध देशांच्या प्रतिनिधींच्या भूमिका साकारल्या. ‘युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्ज’, ‘युनायटेड नेशन्स हुमन राईटस् कौन्सिल’,





‘डिसार्मामेंट अँड इंटरनॅशनल सिक्युरिटी कमिटी’ अशा ज्वलंत विषयांवर विचार मांडले.

त्यात सिध्दी तांबे (जर्मनी) , अद्वैता पानगे (जपान) , सुरभी जगताम (आर्मेनिया), वीरा विखे (अझेरबैजन) , मीत कोळी (अलबेनिया), शाश्वत कुमार ( ब्राझील) , रितिका गोंदकर ( रिपब्लिक ऑफ चिले ) , अद्वैत फोपसे (जपान) , भूवी कोठारी ( इंडोनेशिया) या विविध देशांचे प्रतिनिधित्व करील वरील विषयावर आपले विचार प्रभावीपणे मांडले.

संजीवनी शैक्षणीक संकुलाचे अध्यक्ष नितिन कोल्हे, कार्यकारी अमित कोल्हे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी डायरेक्टर ऑफ स्कूल ऑडीट अँड कम्प्लायंसेस सुंदरी सुब्रमण्यम, प्राचार्या रीना राजपुत, हेड मिस्ट्रेस रेखा साळुंके आदि उपस्थित होत्या.

एमयुएन हा एक शैक्षणिक उपक्रम आहे. त्यात विद्यार्थी वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधींची भुमिका साकारून, हवामान बदल, दहशतवाद, मानवाधिकार, गरीबी, आरोग्य या समस्यांवर चर्चा, वादविवाद, वाटाघाटी, करून त्यावर उत्तर शोधतात. त्यातून विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य, संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, समुह कार्यपध्दती,जागतिक दृष्टिकोन विकसीत होतो. यंदा पाचशेहून अधिक स्पर्धकांतून संजीवनी इंटरनॅशनल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी हि चमकदार कामगीरी केली. हि कौतुकास्पद बाब आहे.

**डॉ.मनाली कोल्हे,संचालिका**
**संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्स.**

## भाजप शहराध्यक्ष वसंत कदम यांचा राजीनामा

**राहुरी : हॅलो प्रभात**



नगर-मनमाड रोडवरील सातत्याने होत असलेल्या अपघातांमुळे संतापलेल्या भाजप राहुरी फॅक्टरी शहराध्यक्ष वसंत कुंडलिक कदम यांनी आपला पदाचा राजीनामा माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्याकडे सुपूर्द केला आहे.श्री. कदम यांनी आपल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांपासून नगर-मनमाड रोडवरील दुरावस्थेमुळे शेकडो नागरिकांचा बळी गेला आहे. मागील दहा दिवसांतच तब्बल सात ते आठ निरपराध नागरिकांना प्राण गमवावे लागले असून, या गंभीर प्रश्नावर कुठलाही जबाबदार लोकप्रतिनिधी आवाज उठवायला तयार नसल्याने आपण अत्यंत व्यथित झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सामाजिक कार्याला गती मिळावी या उद्देशाने तीन वर्षांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र, नागरिकांच्या मृत्यूकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने या किळसवाण्या राजकारणाची चीड निर्माण झाली आहे. याशिवाय नगर-मनमाड रोड दुरुस्ती कृती समितीमार्फत रस्त्याच्या प्रश्नावर प्रामाणिक लढा देणाऱ्या माझ्यासह सहकाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ही बाब दुर्दैवी आहे. या सर्व कारणांमुळे पक्षात काम करण्याची भावना उरली नसल्याने पदाचा राजीनामा देत असल्याचे श्री. कदम यांनी स्पष्ट केले आहे.

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर कडेठान ग्रामस्थांचे उपोषण मागे



**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड तालुक्यातील कडेठान येथील गायराण व वन जमिनीवर धनदांडग्या लोकांनी गट क्रमांक ६२५, ६८३, ६९१ आणि इतर काही वन जमिनीवर धनदांडग्या लोकांनी बेकायदेशीरपणे कब्जा करून अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण हटविण्यासाठी विठ्ठल दिवेकर व इतर ग्रामस्थांनी दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळपासून लाक्षणिक उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची प्रशासनाने दखल घेत कडेठाण येथील वनक्षेत्रावरील अतिक्रमण कारवाई ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण केली जाईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर माजी आमदार रमेश थोरात यांचे हस्ते लिंबूपाणी घेऊन दुपारी तीन वाजता उपोषण मागे घेतले. यावेळी जय शिवसंग्राम संघटनेने प्रदेश उपाध्यक्ष वसंत साळुंखे, दौंड वनपाल अधिकारी राहुल काळे, भाऊसाहेब फडके, योगेश फडके, महसूल विभागाचे सर्कल मोरे, कडेठान ग्रामविकास अधिकारी पद्मिनी कौठुळे, सामाजिक कार्यकर्ते महेश दिवेकर यांसह सर्व कडेठाण ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी वन विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाला जागे करण्यासाठी उपोषण करण्याचा निर्णय घेतला. या उपोषणावर ग्रामविकास अधिकारी पद्मिनी कौठुळे यांनी लेखी आश्वासन दिले की ग्रामपंचायत आवश्यक ती गायरान गटावरिल अतिक्रमण निष्कासित करणेची प्रक्रिया ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

## राहुरी मार्केट कमिटीत अमूलग्र बदल : अरूण तनपुरे

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीत येत्या काळात खुप क्रांतीकारक बदल झाला आहे. यामध्ये व्यापारी, शेतकरी, सभासद यांचा मोलाचा वाटा आहे. म्हणुनच आपल्या बाजार समितीचे नाव महाराष्ट्रात नव्हे तर भारतात झाले आहे. शेतकरी, कामगार, व्यापारी यांना सर्वांना बरोबर घेऊन आपण काम करत आहोत. त्यामुळेच आपल्याला हे यश मिळाले आहे. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात फळे तसेच भाजीपाल्याचे उत्पन्न वाढत असून शेतकऱ्यांच्या या मालाला होलसेल भाव मिळावा यासाठी नवीन मार्केट



सुरू असल्याचे सभापती अरूण तनपुरे यांनी काढले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर उप सभापती बाळासाहेब खुळे, संचालक गोरक्षनाथ पवार, शाम राव निमसे, रामदास बाचकर, सत्यजित कदम, रखमाजी जाधव, महेश पानसरे, सुभाष डुक्रे, मारूती हारदे, भाऊसाहेब खेवरे, प्रभाकर काळे, अँड. भानुदास नवले, दत्तात्रय कवाने, मंगेश गाडे, सुरेश बाफना, चंद्रकांत पानसंबळ, मधुकर पवार दत्तात्रय शळके आदि उपस्थित होते. श्री. तनपुरे पुढे म्हणाले की, वर्षभरातील बाजार समितीच्या कारभाराबाबत विवरण करण्यात आले. राहुरीसह वांबोरी मार्केटमधे सर्व अद्यावत सुविधा केल्या आहेत. सूतगिरणीच्या जागेवर जनावरांचा बाजार देखील केला असल्याने शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. राहुरी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात फळांसह भाजीपाल्याचे उत्पन्न वाढत आहे. त्यामुळे फळांसह भाजीपाल्याच्या होलसेल मार्केटसाठी नगरपालिकेच्या माध्यमातून साडेतीन एकर क्षेत्र लवकर खरेदी करणार आहोत. त्याची प्रक्रिया देखील सुरू आहे. सभेच्या इतिवृत्ताचे सचिव भिकादास जरे यांनी वाचन केले. आर्थिक ताळेबंदाचे वाचन रामदास बाचकर यांनी केले. तर प्रास्ताविक दत्तात्रय कवाने यांनी केले तसेच आभार चंद्रकांत पानसंबळ यांनी मानले.

## महिलांचे श्रम कमी करण्यासाठीच यांत्रिकीकरण : डॉ.गोरक्ष ससाणे



**राहुरी : हॅलो प्रभात**

दिवसेंदिवस शेतीमध्ये मजुरांची कमतरता भासत आहे. शेतीमध्ये काम करतांना महिलांना अधिकचे श्रम करावे लागत आहेत. शेतीमधील अधिक तर कामे महिला करतात. कृषि विद्यापीठांनी व अनेक संस्थांनी महिलांचे श्रम कमी करणारी अवजारे विकसित केलेली आहेत. महिलांना कृषि यंत्र व अवजारांचे ज्ञान देऊन प्रशिक्षण दिले तर ग्रामीण भागातील शेती समृद्ध होईल. महिलांचे श्रम कमी करायचे असतील तर शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे असल्याचे प्रतिपादन विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाद्वारे भारत सरकारच्या शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत असलेल्या केंद्रीय कृषि मशनरी प्रशिक्षण आणि परीक्षण संस्था, बुदनी, मध्य प्रदेश यांनी मौजे तांभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) या गावात महिलांसाठी तीन दिवसीय सुधारित कृषि अवजारे व यंत्रांचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रशिक्षणाचे उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे बोलत होते. व्यासपीठावर डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुळशीदास बास्टेवाड, बुदनी येथील केंद्रीय कृषि मशनरी प्रशिक्षण आणि परीक्षण संस्थेचे वरिष्ठ तंत्रज्ञान सहाय्यक इंजी. खजेंद्र बोरा, वरिष्ठ टेक्निशियन अनिश मालविया, राहुरी येथील सुलभ इरिगेशनचे संचालक दत्तात्रय कवाणे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ, जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख, ग्रामसेवक राजेंद्र ओहोळ, डॉ. रविकिरण राठोड उपस्थित होते. यावेळी डॉ. सचिन नलावडे म्हणाले की, या प्रशिक्षणातून महिलांनी अवजारे व यंत्रे यांचे तंत्रज्ञान जाणून घ्या, आत्मसात करा. कुटुंबातील एक स्त्री कृषि अवजारे व तंत्रज्ञानामध्ये प्रशिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब तंत्रज्ञान साक्षर होईल. शेती करताना स्मार्ट शेती करा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये डॉ. बास्टेवाड यांनी महिलांचे श्रम कमी करणार्या सुधारीत मनुष्यचलीत कृषि अवजारे यांची माहिती व प्रात्यक्षीक दाखविले. याप्रसंगी दत्तात्रय कवाणे यांनीही विविध कृषि अवजारे व यंत्रांचे प्रात्यक्षीक दाखविले. या प्रशिक्षणामध्ये तीनही दिवस कृषि अवजारांची माहिती देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रविकिरण राठोड, सलीम शेख, राहुल कोर्हाळे व किरण मगर यांनी अथक परिश्रम घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला तांभेरे गावातील शंभरहून अधिक महिलांनी सहभाग नोंदविला.

## प्रात्यक्षिक स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सन्मान

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी फिजिओथेरपी महाविद्यालयात ८ सप्टेंबर रोजी जागतिक फिजियोथेरपी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण उपक्रमाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदनाने वातावरण भक्तीमय झाले.स्पर्धा रिल्स, फिजियो टॅक,अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञान व सर्जनशीलतेचे दर्शन घडवले. तसेच रॅप वॉकद्वारे पॅथॉलॉजिकल गेट पॅटर्न व विकृतीचे प्रात्यक्षिक प्रेक्षकांना प्रेरणादायी



ठरले.या महाविद्यालयात साडेचार वर्षाचा बॅचलर ऑफ फिजिओथेरपी अभ्यासक्रम चालतो तसेच २०२४ पासून मास्टर ऑफ फिजोथेरपी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रारंभ केला.या वर्षीची थीम हेल्दी एजिंग असून ज्येष्ठ नागरिकांमध्ये शारीरिक सक्रियता वाढवणे, पडण्यापासून बचाव करणे,व दर्जेदार जीवनशैली टिकवणे यात फिजिओ थेरपिस्टची महत्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. कम्युनिटी फिजिओथेरपी विभागातर्फे दिनांक ३ सप्टेंबर ३०२५ रोजी सडेगावात मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचा लाभ अनेक ज्येष्ठ नागरिकांना झाला. तसेच फिजीओथेरपी विषयी जनजागृती करण्यात आली.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य डॉ.गंगाधरण म्हणाले की हेल्दी एजिंग ही आरोग्य सेवेची एक महत्त्वाची गरज आहे.यामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून बचाव होतो.व वृद्धांना स्वावलंबी जीवन जगता येते.यावेळी विविध स्पर्धांचे विजेते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली तसेच विद्यार्थ्यांनी समाजासाठी निस्वार्थीपणे कार्य करण्याची प्रतिज्ञा केली.या कार्यक्रमास कार्यक्रमाचे उद्घाटन आरजेएस फाउंडेशनचे चेअरमन चांगदेव काकडे,सचिव प्रसाद कातकडे, मॅनेजिंग डायरेक्टर प्रणित कातकडे, उद्योजक विजय कडू, दीपक कोटमे, प्राचार्य डॉ. गंगाधरन व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

## मुळा धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**राहुरी : हॅलो प्रभात**

मुळा धरण परिसरातील मुळा डॅम धरणात एका तरुणाचा पाण्यात पडून मृत्यू झाल्याची एक धक्कादायक घटना घडली आहे. श्रीरामपूर तालुक्यातील शुभम लक्ष्मण घोडके (वय २४, रा. सूतगिरणी सम्राट नगर, श्रीरामपूर) या तरुणाचा मृतदेह पाण्यात आढळून आला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शुभम घोडके आपल्या चार मित्रांसह राहुरी तालुक्यातील मुळा धरण परिसरात एका मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी आला होता. सायंकाळी सहाच्या सुमारास मरीआई खाईजवळील धरणाच्या कडेला वाढदिवसाचा कार्यक्रम झाल्यानंतर शुभम हा थर्माकोलच्या तराफ्यावर बसून पाण्यात गेला. मात्र, अचानक तो तराफा उलटल्याने शुभम पाण्यात बुडाला.घटनास्थळी उपस्थित मित्रांनी व मत्स्य प्रकल्पातील तरुणांनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला. मोठ्या प्रयत्नानंतर शुभमला पाण्याबाहेर काढून राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण क्षीरसागर यांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले.शुभम हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक गणेश सानप यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याबाबत राहुरी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## पार्श्वनाथ बँकेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

येथील पार्श्वनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा राजारामपुरीतील व्हि.टी.पाटील सभागृहात सभासद समवेत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. बँकेचे चेअरमन विनोद भाई मेहता हे सभेचे अध्यक्षस्थानी होते. बँकेतील कामकाजावर समाधानकारक



चर्चा करण्यात आली. कोकरुडच्या सामाजिक कार्यकर्त्या चंदन भाभी शहा यांचा बँकेतर्फे सत्कार करण्यात आला. क्रीडाई च्या संचालकपदी मौतिक पाटील यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. शंकर पाटील यांनी बँकेतील काम काजाचे मनोगत व्यक्त केले. या सभेला अध्यक्ष विनोद मेहता, उपाध्यक्ष विक्रम शहा,शंकर पाटील, अभय गांधी, अनिल शहा, विनोद ओसवाल, प्रमोद शहा, मौतीक पाटील, केवलसिंग रजपूत, पूनम शहा व इतर संचालक मंडळ उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी जयसिंग पाटील यांनी सभेला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानले.

## झिरो तलाठ्यांकडून होणाऱ्या लुटीस वरिष्ठांचा वरदहस्त ?

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

कडेगाव तालुक्यातील सोनहिरा परिसर हा शेतीत समृद्ध आहे. ताकारी सिंचन योजनेने येथील शेतकरी उत्तम दर्जाची शेती करीत आहेत. त्यामुळे येथील शेतकरी आर्थिक सदन बनला आहे. शेतकऱ्यांना विविध कर्ज प्रकरणासाठी तसेच शेतीच्या विविध शासकीय योजनेसाठी आपल्या शेतजमिनीचा सातबारा,खाते उतारा, तसेच विविध कामासाठी तलाठी कार्यालयात जावे लागते परंतु



अपवाद वगळता चिंचणी मंडलातील सर्वच तलाठी यांनी बेकायदेशीर झिरो तलाठी यांची नियुक्ती केली आहे. आणि झिरो तलाठीच हिरो झालेले दिसत आहे.झिरो तलाठ्यांमुळे तलाठी मुख्यालयात दिसत नसून झिरो तलाठी काम करीत आहेत व शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक करीत आहे. सध्या मशागतीची कामे सुरू आहेत. शेतकऱ्यांना उतारे आदी वेळेत मिळत नाहीत. शेतकऱ्यांची होत आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार निवेदन व तक्रारी करून देखील याबाबत त्यांच्याकडून उदासीन भूमिका दिसत आहे त्यावरून या सर्व लुटीला वरिष्ठांचा वरदस्त आहे का? असा सवाल सामान्य नागरिक करत आहेत.

## ऑपरेशन सिंदुरचे यश हे भारतवासियांच्या शौर्याचे प्रतिक : देवेंद्र औताडे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

ऑपरेशन सिंदुरचे यश हे तमाम भारतवासियांच्या ध्यासाचं शौर्याचे प्रतिक आहे, भारत ही आमची पहिली मातृभुमी त्यानंतर आई वडील असे प्रतिपादन भारतीय वायुसेनेचे विंग कमांडर देवेंद्र बाबासाहेब औताडे यांनी केले. भारतीय वायुसेनेचे विंग कमांडर देवेंद्र औताडे यांना ऑपरेशन सिंदुर कामगिरीबददल शौर्य पुरस्कार मिळाल्याबददल त्यांचा सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्यावतीने संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या हस्ते शुक्रवारी सत्कार करण्यांत आला त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्थ सुमितदादा कोल्हे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यकारी संचालक सुहास यादव यांनी प्रास्तविक केले.

अध्यक्षपदावरून बोलतांना बिपीनदादा कोल्हे म्हणाले की, भारतीय वायुसेनेचे भूषण आणि आमच्या कुटूंबातील घटक देवेंद्र औताडे यांनी



देशवासियांना अभिमान वाटेल अशी कामगिरी बजावून आई वडीलांनी दिलेल्या संस्काराची परतफेड केली आहे. माजीमंत्री शंकरराव कोल्हे यांनी येथील युवकांना सैन्यातील भरतीपुर्व प्रशिक्षण देण्यांचे केंद्र सुरू करून त्यातुन शेकडो युवकांमध्ये देशसेवेची भावना जागृत करण्याचे काम केले त्यांच्याच पावलांवर पाउल ठेवुन हे काम आम्ही सुरू ठेवले आहे.

देवेंद्र औताडे सत्कारास उत्तर देतांना म्हणाले की, कष्टकरी शेतक-याचा मुलगा म्हणून मला भारतीय वायुसेनेत देशाची सेवा करण्याचे काम मिळाले हेच माझे आयूष्याचे सार आहे. संजीवनीच्या परिसरात माझे बालपण गेले येथुन मला भारतीय वायुसेना देशसेवेचे बाळकडू मिळाले,

आई वडीलांच्या ध्यासातुन अहोरात्र कष्ट घेत मनांत ठरविलेली जिदद पुर्ण केली. जेव्हाही आपल्या देशावर संकट येते तेव्हा भारतीय म्हणून आपण एक होऊन तुटून पडतो.यावेळी औताडे यांचे अभिनंदन करत तहसिलदार महेश सावंत यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी तहसीलदार महेश सावंत, पोलीस निरीक्षक संदीप कोळी,सर्व संचालक आप्पासाहेब दवंगे, ज्ञानेश्वर होन, रमेश आभाळे, बाळासाहेब वक्ते, बाळासाहेब पानगव्हाणे, संजय औताडे, अशोकराव औताडे, विजय रोहोम, गणपतराव औताडे, रामभाऊ औताडे, यांच्यासह संजीवनी उद्योग समुहातील संचालक पदाधिकारी, कार्यकर्ते, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

शेवटी संचालक बाळासाहेब वक्ते यांनी आभार मानले.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
| --- | --- | --- |
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976